IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

# एक प्रबोधनात्मक लोककला प्रकार- कीर्तन

सहा. प्रा. सौ. स्वाती नवनाथ पवार
M. A. B.Ed (मराठी विभाग)
एम. एम.जगताप महाविद्यालय, महाड-रायगड.

**सारांश...**

महाराष्ट्रात कीर्तनाला एक दीर्घ परंपरा आहे लोकशिक्षणाचे आणि लोकप्रबोधनाचे प्रभावी कार्य कीर्तन या परंपरेने केले आहे. महाराष्ट्रात पूर्वापार चालत आलेल्या ला परंपरेत कीर्तनाची परंपरा खूप महत्त्वाची ठरते.

**प्रस्तावना...**

किर्तन शब्द संस्कृत आत किर्त या धातूपासून उद्भवला आहे ज्याचा अर्थ गाण्याचा आहे श्रीमत भागवत या ग्रंथात ज्या नवविधा भक्ती सांगितलेल्या आहेत त्यापैकी दुसऱ्या क्रमांकाचा हा भक्ती प्रकार आहे.

**श्रवणकीर्तनविष्णो :स्मरणपादसेवनम् !**
**अर्चनवंदनदास्यंसख्ख्यंआत्मनिवेदनम् !!**

भाषा प्रदेश संप्रदाय धार्मिक पार्श्वभूमीनुसार धार्मिक व आध्यात्मिक व्यक्तीचा सहाय्याने वेगवेगळया पद्धतीने सादर होणारी काव्यसंगतीच्या सभेतील श्रोत्यांना सहभागी करून घेत भक्तीरसाची निर्मिती करणाऱ्या परंपरेस कीर्तन असे म्हणतात

महाराष्ट्रात धार्मिक कार्याच्या निमित्ताने होणाऱ्या नाट्य अभिनय नृत्य काव्य संगीत कथा निरूपण इत्यादींच्या साहाय्याने लोकरंजन करताना श्रोत्यांना भक्तीरस निर्मिती प्रक्रियेत सहभागी करून घेत आध्यात्मिक प्रबोधन साधणाऱ्या एकपात्री प्रयोगाच्या परंपरागत लोककलेस कीर्तन असे म्हणतात.

**कीर्तनाचा इतिहास...**

भारतीय कीर्तनपरंपरेला फार मोठा इतिहास आहे.

अति प्राचीन काळापासून देवर्षी नारद नावाचे सर्वश्रुत ऋषी होऊन गेले त्यांनीच ही परंपरा सुरू केली असे मानले जाते. संस्थापित केलेल्या कीर्तन पर्यंतचा विकास हळूहळू त्यांच्याच काळात होत होता. काही अभ्यासकाने सामवेदांपर्यंत या परंपरेचे मूळ नेले आहे. पुण्यात भरलेल्या 1991 सालच्या कीर्तन संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणाच्या प्रारंभी चिंतामणराव वैद्य यांनी 'माझ्या मते कीर्तन संप्रदायाचा उगम फार खोल जातो तो प्राचीनतम असून त्याचा संबंध सामवेदशी लावता येईल' असे उद्गार काढले होते.किर्तन परंपरा वेदकाळापासून चालत आलेली आहे. ऐतिहासिक काळाचा विचार केला तर मात्र ही कीर्तन परंपरा प्रगल्भ स्वरूपात आलेली आहे .नामदेव ज्ञानदेवांपासून आजपर्यंत अनेक अंगाने परंपरा विकसित झालेले आपणास दिसते. तेराव्या शतकातील सर्वात प्रभावशाली कीर्तनकार संत नामदेव होते.नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी नामदेवांच्या ओळीवरून नामदेवांचे कीर्तन परंपरेचे स्थान लक्षात येते. महाराष्ट्रातून पंजाबपर्यंत नामदेवांनी या संप्रदायाचे पताका नेली आज वारकरी संप्रदायात या परंपरेचा वटवृक्ष झाल्याचे दिसते कीर्तनात नारदीय, वारकरी, रामदास हे तीन प्रमुख संप्रदाय येतात. शिवाय गाणपत्य आणि शाक्त हेही संप्रदाय येतात पण सध्या हे दुर्मिळ झाले आहेत. महाराष्ट्रात आज नारदीय व वारकरी या दोन महत्त्वपूर्ण किर्तन परंपरा आहेत.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

**किर्तन प्रकार.......**

**नारदीय परंपरा....**

या परंपरेची सुरुवात नारदांपासून पासून झाली असावी प्राचीन भारतातील सुत शौनकांच्या परंपरेत नारदीय कीर्तनाची प्रस्पुरणे पहावयास मिळतात. नारदिय कीर्तनाच्या संरचनेबद्दल मराठी विश्वकोशकार म्हणतात 'नारदीय संप्रदायाच्या कीर्तनात 'पूर्वरंग' आणि 'उत्तरंग' असे दोन भाग असतात नमन, निरूपणाचा अभंग आणि निरूपण याला 'पूर्व रंग' आणि उदाहरणादाखल एखादा आख्यात सांगण याला उत्तरंग म्हणतात पूर्व रंगात निळोबाचा अपवाद करता तुकाराम पर्यंतच्याच संतांचा अभंग लावण्याचा संकेत असून तो कीर्तनकार पाळतात. या दोन रंगांच्या मध्ये कीर्तनकाराला हार घालतात व सर्वांना बुक्का लावतात. शेवटी आख्यानांचं पर्यवसान आरंभी च्या निरुपणाच्या अभंगात करून तो अभंग आणि 'हेचि दान देगा देवा' हा तुकारामांचा अभंग म्हणून आरती करतात. नारदीय कीर्तन हे प्रामुख्याने अभिजनांसमोर होत असल्याने त्याची भाषा ही प्रमाण मराठी भाषा असते. त्यात अधून मधून मोरोपंतांच्या संस्कृत प्रचूर आर्या तसेच वामन पंडित आदींचे अशाच स्वरूपाच्या भाषातील श्लोक यांची पखरण कीर्तनकार करतात . नारदीय कीर्तनात या कीर्तनात तंबोरा पखवाज टाळ आणि हार्मोनियम इत्यादीचा उपयोग केला जातो.

**वारकरी संप्रदाय......**

या परंपरेत साधारणपणे कीर्तनाचे स्वरूप हे सामुदायिक असते. ही परंपरा नामदेवांपासून दिसते या प्रकारात दहापेक्षा जास्त टाळकरी रांगेत उभे राहून मुख्य कीर्तनकार बुवाला साथ देतात. विना ,मृदंग आणि गायनात प्रवीण अशी मंडळी असा 'फड' असेल तर कीर्तन रंगात येते. वारकरी संप्रदायाच्या कीर्तनात आख्यान गौण असते मुख्य तत्व निरूपण भजन असते.

वारकरी कीर्तनाची भाषा ही लोकभाषा असते. ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम ,एकनाथ आधी संतांच्या अभंगांवरती कीर्तनकार कीर्तन करीत असतो. सरळ साधी सोपी बोलीभाषा कीर्तनकार वापरतो 'जय जय राम कृष्ण हरी' या भजनापासून सुरू झालेले हे कीर्तन' जय विठ्ठल जय जय विठ्ठल' या भजनाने संपते. वारकरी करताना विणा, टाळ मृदंग आणि कधी कधी हार्मोनियम या वाद्याचा समावेश होतो.

**निष्कर्ष....**

नारद मुनींनी कीर्तनाला प्रारंभ केला. नारद मुनींनी ते महर्षी व्यासांना शिकवले.व्यास महर्षीने शुक्रास शिकवले. आणि पुढे त्याचा प्रसार सर्वत्र झाला. अशी कीर्तन परंपरा सांगितली जाते. वस्तूतः 'श्रीहरी कीर्तन' खेड्यापाड्यापर्यंत पोहोचले आहे. सर्व लोकांना ईश्वर भक्ती मध्ये रममान करणे हा याचा उद्देश आहे .आणि कीर्तनकाराने कीर्तन आणि छत्रपती शिवाजीच्या काळात व ब्रिटिशांच्या काळात बरेच जनजागरण घडून आणले.किर्तन हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैशिष्ट्य असून समाजाची अभिव्यक्ती त्यातून व्यक्त होते.धार्मिक सार्वजनिक व सांस्कृतिक जीवनात धर्मोपदेश व नैतिक तत्वांचे प्रतिपादन करणारे कीर्तन हे प्रभावी प्रसारमाध्यम आहे.

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 5.731

Volume 2, Issue 7, January 2022

**संदर्भ ग्रंथ**

[1].गाडगे बाबांच्या किर्तन शैलीचे वेगळेपण--- डॉ. यशवंत सोनूने

[2].डॉ. साहेब खंदारे--- लोकसाहित्य शब्द आणि प्रयोग

[3].डॉ. प्रभाकर मांडे--- लोक रंगभूमी

[4].श्री नामदेव महाराजांचे अभंग गाथा.

[5].प्रतिष्ठान- लोकसाहित्य, विशेषांक मराठवाडा साहित्य परिषद ,औरंगाबाद, जानेवारी १९८८.